# शेतकरी आत्महत्यांचे चिकित्सक अध्ययन

## (वाशिम जिल्ह्याचा व्यष्टी अभ्यास)

## -सारांश-

**प्रस्तावना :**

विकासाच्या उंबरठ्यावर उभ्या असणाऱ्या भारताची जागतीक महासत्ता बनविण्याकडे वाटचाल सुरू आहे. विकासाच्या मार्गावर मार्गक्रमण करणाऱ्या या भारताला सहाजिकच अनेक समस्यांनी जसे दारिद्रय, उपासमार, बेकारी अतिलोकसंख्या यांनी आव्हान दिलेले आहे. या समस्यांच्या जोखडातून समोर निघणाऱ्या या देशाला आणखी एका मुख्य समस्येने हेरले असून त्याने तर देशाच्या अर्थव्यवस्थेचा कणा असणाऱ्या 'शेतीवर' च आघात केला आहे. आधुनिक काळात चर्चील्या जाणारी, जागतीक पातळीवर चिंतेचा विषय बनलेली एक समस्या म्हणजे 'शेतकऱ्याची आत्महत्या' होय.

शेतकरी आपली सर्व जमापुंजी शेताच्या जमिनीतून पेरतो, कष्टाने घाम गाळून निसर्गाला विणवणी करत पावसाची चातकाप्रमाणे वाट पाहतो. या प्रतिक्षेचा लाभ पावसाने जर योग्यवेळी हजेरी लावली तरच होतो. अन्यथा त्याला पावसाची वाट बघावी लागते. अशावेळी शेतकऱ्यासमोर चित्र उभे राहते ते त्याच्या उपाशी कुटुंबाचे, कर्ज घेतलेल्या सावकारी आणि बँकाचे यातुनच त्याच्यातिल निराशाजनक विचार वाढीला लागतात व त्यातुनच ते 'आत्महत्येच्या' निर्णयाप्रत पोहचताना दिसतात. या अनुंषगाने निर्माण झालेल्या समस्येचे सुत्रण करण्यासाठी शेतकरी आत्महत्यांचे चिकित्सक अध्ययन (वाशिम जिल्ह्याचा व्यष्टी अभ्यास) हा संशोधन विषय निवडला आहे.

**संशोधनाची उद्दिष्टये :**

**प्रस्तुत अध्ययनाचे उद्दिष्टये पुढीलप्रमाणे**

१. वाशिम जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या आर्थिक, सामाजिक व शैक्षणिक स्थितीचे अध्ययन करणे.

२. आत्महत्या केलेल्या शेतकऱ्यांचे वय, कुटुंबांचा आकार, जमिनीवरील मालकी, पिकांचा उत्पादनव्यय आणि कर्जबाजारीपणा इत्यादींचे अध्ययन करणे.

३. वाशिम जिल्ह्यातील सिंचन व्यवस्था व सिंचनाखालील क्षेत्रांचा अभ्यास करणे.

४. वाशिम जिल्ह्यामध्ये शेतकऱ्यांना प्राप्त होणाऱ्या कर्जपुरवठ्याच्या स्थितीचे अध्ययन.

५. वाशिम जिल्ह्यातील शेतीशी संबंधीत विविध पैलुंचा (प्रमुख पिके, पिक पद्धती व त्यातील बदल इ.) अभ्यास करणे.

६. शेतकरी आत्महत्येस कारणीभूत ठरणाऱ्या विविध पैलुंचा अभ्यास करणे व उपाय योजना सुचविणे.

**संशोधन पद्धती :**

प्रस्तुत संशोधनासाठी प्राथमिक सामग्री व द्वितीयक सामग्रीचा वापर केला आहे. प्राथमिक सामग्रीमध्ये निरिक्षण पद्धत, मुलाखत पद्धत, प्रश्नावली माध्यम, अनुसूची, सर्वेक्षण यांचा वापर करण्यात आला आहे. जी माहिती अगोदरच लिखित किंवा प्रकाशित स्वरुपात अस्तित्त्वात असते. त्या सामग्रीस दुय्यम सामग्री असे म्हणतात. यामध्ये प्रकाशित प्रलेख, ग्रंथ, मासिके, वर्तमानपत्रे इत्यादींचा वापर केला आहे.

**नमुना निवड :**

सन २००६ ते २०११ या सहा वर्षाच्या कालावधीत वाशिम जिल्ह्यामध्ये ८२१ शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या आहेत. प्रस्तुत विषयाच्या अध्ययनाकरिता आत्महत्या केलेल्या २०५ शेतकरी कुटुंबाची सहेतुक नमुना निवड पद्धतीने केली आहे. अर्थात तालुकानिहाय २५ टक्के नमुना निवडला आहे. प्रश्नावलीच्या/मुलाखतीच्या/अनुसूचीच्या माध्यमातून प्रस्तुत विषयाबाबतची माहिती गोळा केली आहे.

**व्याप्ती व कालावधी व मर्यादा:**

सदर विषयाच्या अध्ययनासाठी २००६ ते २०११ असा सहा वर्षाचा कालावधी निश्चित करण्यात आलेला आहे. तसेच अध्ययनासाठी निश्चित करण्यात आलेली भौगोलिक व्याप्ती ही वाशिम जिल्ह्यापुरती मर्यादित आहे.

मर्यादा :

१. सदर संशोधन हे वाशिम जिल्ह्यापुरते मर्यादित आहे.

२. प्रस्तुत संशोधन हे आत्महत्या झालेल्या शेतकऱ्यांच्या कुटुंबापुरते मर्यादित आहे.

**संक्षिप्त सारांश-**

संशोधनासाठी पाच प्रकरणांची रचना करण्यात आली असून त्यांचा संक्षिप्त सारांश पुढीलप्रमाणे

**प्रकरण पहिले - प्रस्तावना**

संशोधन विषयाची प्रस्तावना, संशोधनासाठी निवडलेली संशोधन पद्धती आणि संशोधन विषयाशी संबंधीत घेण्यात आलेल्या साहित्याचा आढावा घेण्यात आला आहे. प्रस्तावना करतांना प्रामुख्याने शेती व्यवसायाचे अर्थशास्त्रीय महत्त्व, संशोधन कालावधीमध्ये प्रामुख्याने सन २०००-२००८ या कालावधीतील शेतकऱ्यांच्या संपूर्ण भारतातील शेतकऱ्यांच्या आत्महत्यांची संख्या, महाराष्ट्रातील शेतकरी आत्महत्या, अमरावती विभागातील शेतकऱ्यांच्या आत्महत्या आणि संशोधनाचे क्षेत्र असणाऱ्या वाशिम जिल्ह्यातील शेतकरी आत्महत्येची स्थिती वर्णणारे आकडे मांडले आहेत. ाशिम जिल्ह्यात झालेल्या शेतकरी आत्महत्येचे तालुकानिहाय अध्ययन केल्यास सन २००६ ते २०११ या कालावधीत झालेल्या एकूण ८२१ आत्महत्येपैकी सर्वाधिक आत्महत्या या कारंजा तालुक्यात २०५ झाल्या, मालेगाव तालुक्यात १५१, रिसोड तालुक्यात १४२, मंगरुळपीर तालुक्यात १२७, मानोरा तालुक्यात ११६ तर वाशिम तालुक्यात सर्वात कमी ८० शेतकऱ्यांच्या आत्महत्या झालेल्या आढळून आल्या. एकंदरीत शेतकऱ्यांच्या आत्महत्येचा विचार हा गंभीर प्रश्न असून जिल्ह्यात सहा वर्षात केवळ शेतकऱ्यांच्या ८२१ आत्महत्या होण ही बाब शेतकऱ्यांच्या प्रश्नांना जगासमोर उभे करणारी आहे. शेतकरी आत्महत्येशी संदर्भीत साहित्य अभ्यासले असून यात पुस्तके, शासकीय अहवाल, संशोधित प्रकाशित आणि अप्रकाशित माहिती अभ्यासली आहे.

**प्रकरण दुसरे - वाशिम जिल्हा : एक दृष्टीक्षेप**

महाराष्ट्र राज्य हे भारतातील एक प्रमुख राज्य म्हणून ओळखले जाते. महसूली राज्यकारभाराच्या दृष्टीने महाराष्ट्र राज्याचे सहा भागात विभाजन करण्यात आलेले आहे. या सहा भागांमध्ये ३५ जिल्हे असून ३५६ तालुक्यांचा समावेश आहे. या सर्व प्रशासकीय विभागातील एक महत्त्वपूर्ण विभाग म्हणून अमरावती विभाग ओळखला जातो. या विभागात पाच जिल्ह्यांचा समावेश असून यामध्ये अनुक्रमे अकोला, अमरावती, बुलडाणा, यवतमाळ आणि वाशिम हे जिल्हे येतात. या पाच जिल्ह्यांपैकी प्रस्तुत संशोधनाचे अध्ययन क्षेत्र असलेल्या वाशिम जिल्ह्याची आर्थिक व सामाजिक वैशिष्ट्ये, भौगोलिक रचना, जिल्ह्यातील पायाभूत सुविधांचा अभ्यास प्रस्तुत प्रकरणात केला आहे.

**प्रकरण तिसरे - आत्महत्या केलेल्या शेतकऱ्यांची पाहणी**

भारतीय अर्थव्यवस्थेला ज्याने कृषी अर्थव्यवस्थेचा मान मिळवून दिला अशा बळीराजाला मात्र वास्तविक जीवन जगतांना अनेक समस्यांचा सामना करावा लागतो. परिणामतः या समस्यांचे रुपांतर आत्महत्येसारख्या प्रकारात होते. प्रस्तुत अध्ययनात अशाच कर्जबाजारी आणि नापिकी, दुष्काळ व अवर्षण या चक्रव्युहात अडकून आत्महत्येला कवटाळणाऱ्या शेतकऱ्यांच्यांची पाहणी केली

आहे. ही पाहणी करतांना वाशिम जिल्ह्यातील सहा तालुक्यातील २०५ आत्महत्या केलेल्या शेतकरी कुटुंबांची स्थिती अभ्यसली आहे. अभ्यासासाठी मुलाखत अनुसूचीच्या माध्यमातून माहिती संकलित करुन तीचे सारणीयन व विश्लेषण केले आहे.

**प्रकरण चौथे - आत्महत्यांची कारणमिमांसा**

प्रस्तुत प्रकरणात शेतकऱ्यांच्या आत्महत्येशी संबंधीत कारणांचे अध्ययन केले आहे. तसेच प्राथमिक सर्वेक्षणाच्या आधारे वाशिम जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या आर्थिक स्थिती व आत्महत्येच्या कारणांच्या विश्लेषणाचा अभ्यास केला आहे.

**प्रकरण पाचवे - सारांश, निष्कर्ष आणि शिफारशी**

प्रस्तुत प्रकरणात वाशिम जिल्ह्यातील शेतकऱ्यांना उद्‌भवणाऱ्या समस्या, संशोधनातून समोर आलेले निष्कर्ष व शेतकऱ्यांचे आत्महत्या थांबविण्यासाठी काही सूचना व शिफारशी सूचविण्यात आल्या आहेत.

वाशिम जिल्ह्यातील शेतकरी आत्महत्येचे चिकित्सक अध्ययन केल्यानंतर पुढील निष्कर्ष प्राप्त झालेत.

**सर्वसाधारण निष्कर्ष -**

१. कृषीप्रधान अर्थव्यवस्था असणाऱ्या भारतात जेथे अजुनही तीन चतुर्थांश जनता रोजगारासाठी उदरनिर्वाहासाठी शेतीवर अवलंबून आहे.
२. ग्रामीण भागात तर शेतीहाच लोकांचा मुख्य व्यवसाय असून शेतीच्या विकासावरच त्यांचा विकास अवलंबून असलेला आढळतो.
३. आर्थिक नियोजनात कृषी क्षेत्रावरील खर्चाचे प्रमाण कमी होत आहे.
४. आर्थिक विकासाचा वेग वाढविण्यासाठी कृषी क्षेत्रातील वाढावा आवश्यक आहे.
५. शेती हा भारतातील सर्वार्थाने महत्त्वाचा व पायाभूत उद्योग आहे.
६. भारतीय अर्थव्यवस्थेत शेतीला महत्त्वूपर्ण स्थान आहे.
७. भारतीय शेतीचे उत्पादन अधिक आहे परंतु शेतीची उत्पादकता कमी आहे .
८. भारताच्या संदर्भात शेतीची उत्पादकता कमी असण्याची अनेक कारणे आहेत.
९. भारतातील शेतकऱ्यांच्या आत्महत्या कृषीप्रधान अर्थव्यवस्थेपुढील आव्हान आहे.
१०. महाराष्ट्रातील विविध जिल्ह्यात आणि पश्चिम विदर्भात आत्महत्या करणाऱ्या शेतकऱ्यांच्या संख्या मोठ्या प्रमाणावर आहे.

प्रस्तुत संशोधन विषयाचे प्रकरण **पाचमध्ये** प्राथमिक सर्वेक्षणाच्या आधारे शेतकऱ्यांच्या जीवनमानाच्या दर्जाचे विश्लेषण केले आहे यामध्ये प्रामुख्याने शेतकऱ्यांची वैयक्तिक स्थिती, साक्षरता, कौटुबीक, आर्थिक व सामाजिक स्थिती अभ्यासली आहे. सदर अभ्यासासाठी मुलाखतसूचीच्या आधारे अध्ययन करून पुढील निष्कर्ष काढण्यात आले.

- सर्वेक्षित २०५ शेतकऱ्यांपैकी निरक्षर शेतकऱ्यांचे प्रमाण सर्वात जास्त होते.
- सर्वेक्षित शेतकऱ्यांमध्ये सर्वाधिक शेतकरी १४८ (७२.२० टक्के) हे रू १० ते ३० हजार वार्षिक उत्पन्न असणारे होते, तर सर्वात कमी ०३ (१.४६ टक्के) शेतकरी हे रू ९० हजाराच्या वर वार्षिक उत्पन्न असणारे होते.
- सर्वेक्षित २०५ शेतकऱ्यांपैकी सर्वच म्हणजे १०० टक्के शेतकरी हे कर्ज काढणारे असलेले आढळून आले.
- सर्वेक्षित शेतकऱ्यांपैकी सर्वात जास्त शेतकरी कोरडवाहू शेती असणारे होते.
- वाशिम जिल्ह्यातील शेतकऱ्यांमध्ये बहुपीक पध्दतीचा अभाव हे शेतकऱ्यांच्या आत्महत्येचे कारण ठरते.
- सर्वेक्षित शेतकऱ्यांपैकी सर्वात जास्त ८४ (४०.९८ टक्के) शेतकऱ्यांनी शेतीसाठी कर्ज घेतलेले आढळते. विविध कार्याकरीता घेतलेल्या या कार्यांचा व्याप वाढल्यामुळे शेतकऱ्यांना कर्ज परत करणे शक्य न झाल्यास त्यांच्यावर आत्महत्या करण्याची वेळ येते.
- सर्वेक्षित शेतकऱ्यांपैकी सर्वात जास्त शेतकरी ज्या कामासाठी कर्ज घेतात त्या कामासाठी कर्जाचा वापर करीत नाहीत. अशावेळी शेतकऱ्यांची परिस्थिती आणखीच खालावते व त्यांच्यावर उपासमार आणि आत्महत्येची वेळ येते.
- सर्वेक्षित शेतकऱ्यांचे मागील तीन वर्षापासून कमी होत गेलेले आढळते. एकंदरीत सतत कमी होणारे वार्षिक उत्पन्न आणि वाढता खर्च यांच्या पेचप्रसंगात सापडलेले शेतकरी मोठ्या प्रमाणावर आत्महत्या करण्याचा मार्ग अवलंबीतात.
- सर्वेक्षित शेतकऱ्यांपैकी सर्वात जास्त १८७ (९१.२२ टक्के) शेतकऱ्यांनी नापीकीमुळे आत्महत्या केलेली आढळून येते.

**उपाययोजना (शिफारशी)-**

प्रस्तुत संशोधन विषयाच्या अध्ययनातून समोर आलेले निष्कर्ष व त्याआधारे सूचना व शिफारशी सुचविण्यात आल्या आहेत.

१. शासनाने सहकारी बँकांमार्फत शेतकऱ्यांना अधिकतम दरसाल दर शेकडाइ २ टक्के दरावर मोठ्या प्रमाणावर कर्ज पुरवठा केल्यास शेतकऱ्यांची खाजगी सावकाराच्या जाचातून मुक्तता होईल आणि आत्महत्या कमी होण्यास मदत होईल.
२. शासनाच्या पुढाकाराने कृषि उत्पादनाच्या किंमती निर्धारित व्हाव्यात व सहकारी, कृषी खरेदी विक्री केंद्राद्वारा कृषि मालाची खरेदी विक्री व्हावी जेणेकरुन शेतकरी आत्महत्या थांबतील.
३. प्रत्येक गांव पातळीवर कृषी माल साठविण्याची केंद्रे स्थापन करुन त्याच मालावर अत्यल्प व्याजदरावर शेतकऱ्यांना कर्ज उपलब्ध करुन देण्यात यावी. म्हणजे शेतकऱ्यांची व्यापाऱ्यांकडून आणि खाजगी सावकारांकडून होणारी पिळवणूक थांबू शकेल.
४. शेतकऱ्यांनी स्वतःच शेतीत होणाऱ्या अतिरिक्त खर्चाचे प्रमाण कमी करुन उत्पादन खर्च मर्यादीत करावा.
५. शेती व शेतकऱ्यांचा विकास होण्यासाठी शेतीचे व्यवस्थापन गरजेचे आहे.
६. शेतमालाला उत्पादन खर्चावर आधारित हमी भाव सरकारने द्यावा.
७. शेतकरी कर्जात आकंठ बुडालेला आहे. त्यामुळे तो आत्महत्येला प्रवृत्त होत आहे. त्याला आत्महत्येपासून परावृत्त करण्यासाठी कर्जमाफी ही पहिली गरज आहे.
८. पश्चिम महाराष्ट्राप्रमाणे विदर्भातसुद्धा दुग्ध व्यवसाय, साखर उद्योग, बँकींग व्यवसाय, पतसंस्था इत्यादी क्षेत्रात सहकारी संस्थांची वाढ होणे आवश्यक आहे.
९. जिल्ह्यातील प्रत्येक तालुक्यात, गावात एक मानसोपचार तज्ज्ञाचे पथक नेमून गावागावात लोकांमध्ये जगण्याविषयी सकारात्मक विचार जागविण्याचा प्रयत्न करण्यात यावा.
१०. स्थानिक लोककलाकारांना सोबत घेवून समाज प्रबोधन मनोरंजनातून लोकजागृतीचे कार्य करावे. लोकांना दुःखातही जगण्याविषयी मार्गदर्शन करायचे या सा-यांचा चांगला परिणाम घडू शकतो.

अशाप्रकारे विविध प्रकाराच्या उपाय योजना केल्यास शेतकऱ्यांच्या आत्महत्येसारख्या समस्येला आळा घालणे शक्य होईल. एकंदरीत भारतीय शेतकऱ्यांचे दारिद्र्य हा सखोल चिंतनाचा व संशोधनाचा विषय आहे. यावर अधिकाधिक विचार मंथन होवून वरील उपाय योजना प्रामाणिकपणे अंमलात आणण्याचा प्रयत्न शासकीय यंत्रणा व स्वयंसेवी संस्थांनी केल्यास, स्वतः शेतकऱ्यांनी त्यास प्रामाणिक प्रतिसाद दिल्यास शेतक-यांच्या जीवनात नवीन पहाट उजळण्याची शक्यता नाकारता येत नाही. अन्यथा भारतीय शेती भारतीय अर्थकारणातून हद्दपार होण्यास फारसा विलंब लागणार नाही.